# प्रेसनोट

दि.३०/०५/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीरामपूर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) सारीका भास्कर वांढेकर, वय–४१ वर्ष, मंडळाधिकारी, मंडळाधिकारी कार्यालय, बेलापूर बुा, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर<br>२) बाबासाहेब बाबुराव कदम (खाजगी इसम), वय–५२ वर्ष, रा.राजुरी, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार हे शेतकरी असुन, त्यांची ऐनतपुर शिवारातील गट नं.२१ मधील ०.३५ हेक्टर क्षेत्र हे त्यांना वारसा हक्काने वाटयास आलेले आहे, त्याची फेरफार नोंद मंडळ अधिकारी बेलापूर, बुद्रुक यांचेकडे प्रलंबीत होती. सदर फेरफार नोंद घेण्यासाठी मंडळ अधिकारी यांनी २०००/– रुपये लाचेची मागणी केली बाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगरकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार आज दि.३०/०५/२०२३ रोजी बेलापूर बुद्रुक गावी लाच मागणी पडताळणी करण्यात आली, लाच मागणी पडताळणी दरम्यान यातील आरोपी लोकसेविका क्र.१ सारीका भास्कर वांढेकर यांनी आरोपी क्र.२ बाबासाहेब बाबुराव कदम (खाजगी इसम) यांना तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करण्यासाठी प्रोत्साहन दिले व आरोपी क्र.२ बाबासाहेब बाबुराव कदम यांनी तक्रारदार यांचेकडे मंडळ अधिकारी यांचे करीता २०००/– रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले असे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. त्यानुसार आज दि.३०/०५/२०२३ रोजी मंडळाधिकारी कार्यालय, बेलापुर बुद्रुक येथे सापळा लावला असता सदर सापळा कारवाई दरम्यान आरोपी क्र.२ कदम यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन २०००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत श्रीरामपूर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर